महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ :: संकेतस्थळ / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/ २६३
दिनांक :- ०७/११/२०२३

प्रति,
प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय : **डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रलंबित असलेल्या (विद्यार्थी /संस्था स्तरांवर) अर्जांवरील कार्यवाहीबाबत ........**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२/२७ दि. ११/ ०२ /२०२२
२. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/३७ दि.१४ /०२/२०२३
३. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/१४० दि.११/०५/२०२३
४. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/२५० दि.३०/१०/२०२३

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविलेल्या **महाडीबीटी** (संकेतस्थळ-https://mahadbt.maharashtra.gov.in) **पोर्टलद्वारे** तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.
१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

**महाडीबीटी पोर्टलद्वारे** तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या, उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीबाबत संदर्भीय पत्रान्वये, मागील शैक्षणिक वर्षांचे **संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज** ( Pending at Institute अंतर्गत ), **विद्यार्थी स्तरांवर प्रलंबित अर्ज** ( Sent back अंतर्गत ) व **संस्था स्तरांवर दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याची प्रलंबित कार्यवाही** ( Pending at Institute for IInd Installment ) योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तरी देखील, मागील शैक्षणिक वर्षांचे, **विद्यार्थी स्तरांवर दुरुस्तीसाठी /त्रुटी दूर करण्यासाठी प्रलंबित अर्ज, संस्था स्तरांवर दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्यासाठी तसेच तपासणीसाठी अर्ज प्रलंबित** असल्याचे दिसुन येत आहे.

त्यामुळे, सर्व संस्थांना या पत्राद्वारे पुन:श्च सूचित करण्यात येते की, संस्थांनी प्रलंबित अर्जांचा निपटारा करण्यासाठी खालील तक्त्यामध्ये दिलेल्या सूचनानुसार अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन आठ दिवसांच्या आत अर्ज निकाली काढावेत. तसेच, **भविष्यात संस्थेच्या लॉगिनमध्ये प्राप्त होत असलेले अर्ज कोणत्याही स्तरांवर प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता स्वत: संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: घ्यावी.** विद्यार्थी / संस्था स्तरांवर अर्जांवरील कार्यवाही प्रलंबित कारणास्तव योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास तर त्याबाबतची सर्वश्री जबाबदारी संस्थेच्या प्रमुखाची राहिल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | संस्थांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | अ) संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज ( Pending at Institute अंतर्गत ) | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावेत.तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे.<br>तसेच जर संस्थाकडे पात्र विद्यार्थ्याच्या प्राप्त अर्जांमध्ये भरण्यात आलेल्या वर्षातील संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूर नसेल तर संस्थांनी संबंधितांकडून शुल्क मंजूर करुन घेऊन अर्ज तात्काळ निकाली काढावे आणि जर विद्यार्थ्याने अर्जामध्ये अभ्यासक्रमांबाबतची चुकीची माहिती भरली असेल तर संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्ज Sent Back करुन विद्यार्थ्यांकडून दुरुस्ती करुन प्राप्त करुन घ्यावे व अर्ज तात्काळ निकाली काढण्यात यावे. |
| | ब) संस्था स्तरांवर योजनेचा दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरणे प्रलंबित ( Pending at Institute for IInd Installment ) | संबंधित योजनेचा लाभाचा दुसरा हप्ता अदा करण्यासाठी,**संस्थेच्या शै. वर्षनिहाय क्लार्क/प्राचार्यांच्या लॉगीन आयडी** मध्ये विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याबाबत वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या यादीतील विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरुन अर्ज निकाली काढावे. |
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज ( Sent back अंतर्गत ) | संस्थांनी **पात्र विद्यार्थ्यांना** तात्काळ बोलवून अर्जाची त्रुटी दूर करुन, अर्ज पुन:श्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेच,<br>जर संस्थेकडून **अपात्र विद्यार्थ्यांचे** अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांना सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनद्वारे रद्द करण्याबाबत कळविण्यात यावे किंवा असे अर्ज विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे. जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही. |

**महत्त्वाची सूचना:-** डीबीटी डॅशबोर्डनुसार असे निदर्शनास आले आहे की, संस्था **मागील शै.वर्षाच्या** कार्यवाहीसाठी उपलब्ध अर्जांबाबतची कार्यवाही पूर्ण करत नसल्यामुळे मागील शै. वर्षाचे अर्ज कार्यवाहीसाठी संस्था लॉगीनमध्ये प्रलंबित राहतात. तरी सदर **शै.वर्षनिहाय** प्रलंबित अर्जावरील कार्यवाही प्राधान्याने पूर्ण होण्यासाठी संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: लक्ष द्यावे. जेणेकरुन मागील वर्षाचा एकही अर्ज कार्यवाहीसाठी संस्थास्तरांवर प्रलंबित राहणार नाही.

सही /-
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छ.संभाजीनगर/अमरावती/नागपूर.यांना माहिती व त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करण्याच्या कार्यवाहीसाठी.